B
Accredited By NAAC
(2009)

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (सलंग्नता विभाग - २६०९०८९, २६०९११३६)
तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.२६९३२९४
ई-मेल : affiliationt१@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. अँफि/टी.१/प्राचार्य/चव्हाण/ 170 दिनांक : 20 FEB 2013

प्रति,

१. मा. अध्यक्ष/सचिव
२. प्राचार्य /संचालक/ प्र. प्राचार्य / प्र. संचालक
सर्व संलग्नीत महाविद्यालये /मान्यताप्राप्त संस्था

**विषय:- महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त संस्थेतील प्राचार्य/संचालक पदे भरण्याबाबत.**

महोदय,

विद्यापीठाशी केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहारावरुन असे निदर्शनास आले आहे की,

१. महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त संस्थेतील रिक्त असलेली प्राचार्य / संचालक पदे तात्काळ भरण्याबाबत वारंवार कळवूनही अद्याप काही महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त संस्थेतील प्राचार्य/संचालक पदे रिक्त आहेत.
२. ज्या महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त संस्थेतील प्राचार्य/संचालक पदे रिक्त आहेत अशा बऱ्याच महाविद्यालयांनी / मान्यताप्राप्त संस्थांनी प्रभारी प्राचार्य/संचालक यांच्या मान्यता घेतलेल्या नाहीत.
३. मान्यता नसताना विद्यापीठाकडे अनधिकृत सहीने पत्रव्यवहार केला जातो.
४. ज्या महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त संस्थांना प्रभारी प्राचार्य /संचालक मान्यता असताना नियमित प्राचार्य / संचालक म्हणून स्वाक्षऱ्या केल्या जातात. वास्तविक पाहता ज्या महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त संस्थांना प्रभारी प्राचार्य/संचालक यांच्या मान्यता आहेत त्यांनी प्रभारी प्राचार्य/संचालक म्हणूनच सही करणे आवश्यक आहे.

तरी आपणास आदेशान्वये कळविणेत येते की,

१. रिक्त असणारी प्राचार्य/संचालक पदे भरण्याची प्रक्रिया तात्काळ सुरु करावी.

२. प्रभारी प्राचार्य/ प्रभारी संचालकांच्या तात्पुरत्या मान्यता घेणेसाठी विद्यापीठाकडे तात्काळ प्रस्ताव पाठवावेत.

३. दरम्यानच्या काळात ज्या महाविद्यालयांनी /मान्यताप्राप्त संस्थांनी प्रभारी प्राचार्य/संचालक मान्यता घेतलेल्या नाहीत त्यांनी या कार्यालयाकडे पत्रव्यवहार करताना संबंधित महाविद्यालयाच्या / मान्यताप्राप्त संस्थेच्या संस्था सचिव/अध्यक्ष यांच्या सहीने पत्रव्यवहार करावा. अन्यथा ज्या महाविद्यालयाने /मान्यताप्राप्त संस्थेने प्रभारी प्राचार्य/संचालक मान्यता घेतलेली नसताना प्रभारी प्राचार्य/प्रभारी संचालक म्हणून केलेल्या सहीचा कोणताही पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही किंवा पत्राद्वारे अथवा आवक विभागामध्ये सादर केलेल्या पत्रव्यवहारावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही, त्यामुळे उद्भवणाऱ्या अडचणीस विद्यापीठ प्रशासन जबाबदार रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

**प्रत: माहितीसाठी**

१. स्वीय्य सहाय्यक, मा. कुलसचिव कार्यालय,
२. स्वीय्य सहाय्यक, मा. परिक्षा नियंत्रक कार्यालय,
३. स्वीय्य सहाय्यक, मा. वित्त व लेखा अधिकारी कार्यालय,
४. सर्व उपकुलसचिव, सहा.कुलसचिव
५. सर्व विभागप्रमुख

यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी